# प्रेस नोट दि. २१/०७/२०२२

## गुन्हे शाखा, युनिट - ५  पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड यांची धडक कारवाई

**मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे गुन्हे शाखा युनिट -५ ,पिंपरी चिंचवड यांनी शासन प्रतिबंधित गुटखा विरोधी धडक कारवाई करुन ०२ आरोपी अटक करुन सदर आरोपींचे कडुन  एकुण  ९,२३,१७२ रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे व श्री.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे अनुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले यांनी गुन्हे शाखा युनिट-५ कडील पोलीस उप-निरीक्षक राहुल कोळी, पो.हवा. ९७६ बहीरट, पोहवा १००९ ठाकरे, पोना १६०८ मालुसरे, पोना १९०० शेख, पोशि २०१७ भोसले, पोशि १३०५ खेडकर,  यांची एक टीम तयार करुन त्यांना सुचना देवून अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी रवाना केले होते. सदर टीम गुन्हे शाखा, युनिट - ५, पिंपरी चिंचवड हद्दीत पेट्रोंलींग करत असतांना **पोहवा/९७६ नितीन बहीरट व पोशि/२०१७ भोसले** यांना  गुप्त बातमीद्वारा  मार्फत अवैध गुटखा विक्रीबाबत मिळालेल्या माहिती चे आधारे सदर टीमने देहूरोड पोलीस स्टेशनचे हद्दीत मुकाई चौक ते विकास नगरकडे जाणारे रोडचे उजव्या बाजुला बांधकाम चालु असलेल्या के टाऊन बिल्डींगचे पत्र्याचे कंपाऊड जवळ पंचासमक्ष  छापा टाकून  आरोपी नामे **१) सुरेश मोहनलाल बिश्नोई वय. १९ वर्षे धंदा- व्यवसाय रा. जी.के. बिल्डींग  फ्लॅट नंबर २०५ एच. विंग किवळे ता. मावळ जि. पुणे  २) आसुराम चुनाराम बिश्नोई वय. ३० वर्षे धंदा - व्यवसाय रा. जी.के. बिल्डींग फ्लॅट नंबर २०५ एच. विंग किवळे ता. मावळ जि. पुणे** हे त्यांचे ओळखीचे पानटपरी धारकांना होलसेल गुटखा विक्री करित असताना त्यांना ताब्यात घेतले व त्यांचेकडून **२,४३,६७२ रु.** किंमतीचा शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य गुटखा व  ३०,०००/- रु. किंमतीची ॲक्टीवा स्कूटी नंबर MH14/HA/4465 तसेच ६,५०,०००/- रु. किंमतीची मारुती सुझुकी ब्रीझा गाडी नंबर MH14/JA/2196  असा **एकूण ९,२३,१७२** /- रु किंमतीचा मुद्देमाल आरोपींचे ताब्यातून जप्त करण्यात आला आहे व सदर आरोपींविरुध्द **देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. ४९० /२०२२  भारतीय दंड संहीता कलम १८८, ३२८, २७२, २७३**  अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पाहिजे आरोपी क्र.३ सरवन बिश्नोई रा. कात्रज पुर्ण नाव पत्ता माहीती नाही याचा शोध चालू आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे , मा. अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे , मा.पोलीस उप-आयुक्त श्री. काकासाहेब डोळे , मा.सहा.पोलीस आयुक्त श्री. प्रशांत अमृतकर, यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रामदास इंगवले, गुन्हे शाखा युनिट ५, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक राहुल कोळी, पोहवा ९७६ बहीरट, पोहवा १००९ ठाकरे, पोहवा ७१८ बनसुडे, पोना १६०८ मालुसरे, पोना १९०० शेख, पोशि १३०५ खेडकर, पोशि २०१७ भोसले, पोशि १३०३ इघारे यांनी केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप-आयुक्त, गुन्हे**
**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**